RELIANCE Energy
Anil Dhirubhai Ambani Group

**Reliance Infrastructure Limited**
Reliance Infrastructure Centre
Santa Cruz (East)
Mumbai 400 055
Tel: +91 22 3009 9999
www.rel.co.in

**प्रसिद्धी पत्रक**

# "पतंग उडवताना सावधान.... पारेषण वाहिन्यां जवळ पतंग उडविणे जीवीतास धोकादायक ठरू शकते," रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर

*– पतंगप्रेमींनी पारेषण वाहिन्यांजवळ पंतग उडविणे टाळावे*

*– सुरक्षितता उपाययोजनांची अंमलबजावणी तसेंच या संबंधी ग्राहकांत जागरुकता निर्माण होण्यासाठी मोहिम*

**मुंबई, दिनांक ८ जानेवारी २००९:** वीज ग्राहकांना मकरसंक्राती निमित्त शुभेच्छा देतांना, उपनगरांतुन वीज पुरवठा करणाऱ्या रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने पतंग प्रेमी करिता धोक्याची सुचनाही जारी केली आहे. त्यानुसार, वीज पारेषण वाहिन्यांजवळ पतंग उडविणे हे जीवीतास त्याचप्रमाणे मालमेत्तस ही हानिकारक ठरू शकत असल्याने, पतंगप्रेमींनी पारेषण वाहिन्यांजवळ पतंग उडविणे टाळावें, असे आवाहन रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे करण्यात येत आहे.

मकर संक्रात उत्सवात मोठया प्रमाणावर पतंग उडविण्यात येतांत. पतंग उडविण्याकरिता जो मांजा वापरण्यात येतो, त्यांत बऱ्याचदा धातुची पावडर वापरण्यात येत असते. पारेषण वाहिन्यांजवळ पतंग उडवतांना या मांजाचा पारेषण वाहिन्यांना स्पर्श झाल्यास, अथवा पारेषण वाहिन्यांच्या 'आर्किंग झोनच्या' संपर्कात आल्यास, वीज पुरवठयात निव्वळ खंडच नव्हे, तर जीवीतहानी व मालमत्ताहानी याच बरोबर पारेषण प्रणालीत बिघाड होऊन ग्रीड फेल्युअर सारख्या मोठया अनुचित घटना देखील घडु शकतांत.

या पार्श्वभुमीवर रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर आपल्या २६ लक्ष ग्राहकांना, विशेषतः वर्सोवा, ओशिवरा, गोरेगांव (पूर्व), मालाड (पूर्व), कांदिवली (पू), बोरिवली (पू), तसेंच इतरही कांही भागांत जिथे ओव्हरहेड पारेषण वाहिन्या आहेत, अशा भागांतील पतंग प्रेमींना कळवुं इच्छिते कि, जीवीतहानी, मालमत्ताहानी अथवा अन्य कोणतीही अप्रिय घटना टाळली जावी, या दृष्टीने कंपनीतर्फे जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणुन यासंदर्भातील सुचना वीज देयकांवर जारी करण्यात आली असुन. या व्यतिरिक्त कंपनीच्या पारेषण विभागाचे अधिकारी, कर्मचारी ग्राहकांची भेट घेऊन यासंदर्भातील माहिती समजावुन सांगत आहेंत; तसेंच माहिती पत्रकेंही वाटण्यात येत आहेंत. मोहिमेचाच एक भाग म्हणुन पतंगप्रमींना ही भेटुन पारेषण वाहिन्यांजवळ पतंग उडवण्यापासुन त्यांना परावृत्त करण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

मकर संक्रातीचा सण सुरक्षितपणे साजरा करण्याबाबतचे आवाहन करतांनाच ग्राहकांना विनंती करण्यात येते कि, या संदर्भात कोणतीही अप्रिय घटना नजरेस आल्यास, त्वरित कंपनीच्या पॉवरहेल्प लाईनवर, ३०३० ३०३० या क्रमांकावर कळवावे.